पथकिनारवर्ती नियमात शिथिलता देणेबाबत.

अमलात आणावयाची पद्धत.

महाराष्ट्र शासन,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
परिपत्रक क्र.आरबीडी १०९५/(१९१२)/रस्ते-६,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- १२/११/१९९५

शासनाचे असे निदर्शनास आले आहे की, क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून पथकिनारवर्ती नियमांचा भंग करून बांधण्यात आलेली नवीन बांधकामे अथवा जुनी बांधकामे पाडून त्या ठिकाणी नवीन बांधकाम करण्यास पथकिनारवर्ती नियमामध्ये शिथिलता देण्यासंबंधीची प्रकरणे शासनास मंजुरीसाठी विहित पद्धतीने पाठविली जात नाहीत. पथकिनारवर्ती नियमात शिथिलता ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात येत नसून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीने महसूल व वन विभागाकडून देण्यात येते. याबाबत शासन स्तरावरून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय देण्याच्यादृष्टीने क्षेत्रीय स्तरावरून प्रस्ताव करण्याची खालीलप्रमाणे पद्धत अमलात आणावी.

१) पथकिनारवर्ती इमारती अथवा विनापरवाना झालेल्या कोणत्याही प्रकारच्या बांधकामास पथकिनारवर्ती नियमात शिथिलता देण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर प्राप्त झालेले अर्ज तसेच मा. मंत्रीमहोदयांकडून विभागाकडे प्राप्त झालेले अर्ज, संबंधितांनी विभागाकडे पाठविलेले अर्ज व मंत्रालय स्तरावरून क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे पाठविलेले अर्ज विचारात घेऊन सदर प्रकरणी कार्यकारी अभियंता यांनी संबंधित अधीक्षक अभियंत्यांच्यामार्फत व मुख्य अभियंत्यांचे अभिप्राय घेऊन ते संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे आवश्यक त्या प्रस्तावासह पुढील कार्यवाहीसाठी पाठवावेत.

(अ) पथकिनारवर्ती नियमात शिथिलता देण्याबाबत मुख्य अभियंता यांची शिफारस असल्यास पथकिनारवर्ती नियमात शिथिलता आणि नवीन बांधकामास परवानगी मागणाऱ्या अर्जदाराकडून खालील अटी मान्य असल्याबद्दल स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र देण्याबाबतची अट प्रस्तावात नमूद करावी.

१) रस्ता रुंदीकरणाच्या वेळी अथवा इतर कामाकरिता अर्जात नमूद केलेली जागा शासनास आवश्यक असल्यास ती जागा अर्जदार त्या जागी केलेले बांधकाम स्वखर्चाने विनाविलंब पाडून शासनाच्या ताब्यात देईल.

२) सदर जागा शासनास रस्त्याच्या अथवा सदर कामासाठी ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी कोणताही वाद निर्माण करणार नाही आणि न्यायालयाकडून कोणतीही स्थगिती आणणार नाही अथवा त्यापोटी नुकसानभरपाई मागणार नाही.

३) अर्जदाराने केलेल्या बांधकामामुळे रस्त्याजवळील इतर सेवा, वाहतूक वगैरे कांही क्षति अथवा नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदाराची राहील.

(ब) संबंधित बांधकाम, प्रस्तावित बांधकामाचे रस्त्याच्या मध्यापासूनचे अंतर तसेच नियंत्रणरेषा व इमारतरेषा तसेच खाली दर्शविलेल्या सर्व बाबी दर्शविणारा नकाशा अहवालासोबत सादर करावा

(१) संबंधित बांधकामाच्या दोन्ही बाजूस सर्वसाधारणपणे २०० ते ४०० मीटर अंतरापर्यंत अस्तित्वात असलेली तसेच नवीन प्रस्तावित इतर बांधकामे व त्यांचे रस्त्याच्या मध्यापासूनचे अंतर व अशी बांधकामे केलेल्या व्यक्तींच्या नावाची यादी व इमारतीच्या वापराबाबत माहिती. (२) सदर बांधकाम दोन रस्त्यांच्या सांध्यावर(जंक्शनवर) येत असल्यास तसे नकाशामध्ये स्पष्ट दर्शवावे व टिप्पणीमध्ये त्याचा खुलासेवार उल्लेख करावा.

(क) संबंधित मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या अभिप्रायात पर्यावरणवरील नियमात शिथिलता देण्या अथवा नाकारण्याबाबत स्पष्ट उल्लेख करावा.

वरील पद्धतीप्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे अशी प्रकरणे पाठविल्यानंतर जिल्हाधिकारी ती प्रकरणे महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ मधील तरतुदीनुसार तपासून आवश्यक त्या प्रस्तावासह शासनाच्या महसूल व वन विभाग, मंत्रालय, यांच्याकडे पाठवतील. त्यानंतर महसूल व वन विभागातर्फे शासन स्तरावर आवश्यकतेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिप्राय घेऊन सदर प्रकरणे निकालात काढण्यात येतील.

हे परिपत्रक महसूल व वन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४०२० दि.२८-९-९१ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि. मा. पारखेडकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत-
मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती/विशेष प्रकल्प, मुंबई/राष्ट्रीय महामार्ग, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व अधीक्षक अभियंते, सा. बां. मंडळ(विद्युत व संकल्पचित्र मंडळ व दक्षता व गुण नियंत्रण मंडळ वगळून).
सर्व कार्यकारी अभियंते, सा. बां. विभाग व(विद्युत, संकल्पचित्र व दक्षता व गुणनियंत्रण विभाग वगळून)/जिल्हा परिषद.
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग(ल-२), मंत्रालय, मुंबई/ग्रामविकास विभाग,
कार्यासन, रस्ते-७, सा. बां. विभाग, मंत्रालय, मुंबई(निवडनस्ती) सादरसाठी.
pwd१/umg